www.crimeborder.com

पोलीस व गुन्हेगारी जगताची बित्तंबातमी देणारे

# क्राईम बॉर्डर

Year 12 ★ Issue 06 ★ Pages - 4 ★ Kalyan,Dist Thane, Monday 16 JuneTo 30 June 2022 ★ Price 5.00 ★ R.N.I. No. : MAHBIL/2010/41122 Mbo.No. 9619630035

★ वर्ष : १२ ★ अंक : ०६ ★ पाने : ४ ★ कल्याण, जि. ठाणे, सोमवार ★ १६ जून ते ३० जून २०२२ ★ मूल्य : रु ५.००/- नोंदणी क्र.एमएएचबीआयएल/२०१०/४११२२

## एका टोपीमुळे उकलले हत्येचे गूढ

## दारुच्या नशेत मित्रांने केला मित्राचा निर्घुन खून!

### विष्णूनगर पोलीसांची धडाकेबाज कामगिरी १२ तासात केले आरोपी गजाआड

क्राईम बॉर्डर न्यूज नेटवर्क

**डोंबिवली** :कोणतेही व्यसन हे अतिशय वाईट व घातक असते हे वेळोवेळी अनेक घटनांवरून आपल्याला दिसते परंतु म्हणतात ना? की कळते पण वळत नाही. अशाच प्रकारे डोंबिवली पश्चिम मध्ये एका मित्राने दुसऱ्या मित्राचा नशेच्या धुंदीत आपल्या मित्राचा निर्घुण खून केल्याची घटना वटपौर्णिमेच्या आदल्या दिवशी घडली आहे.



डीसीपी **सचिन गुंजाळ**



एसीपी **सुनिल कुराडे**



व.पो.निरी. **पंढरीनाथ भालेराव**

डोंबिवली पश्चिम येथील बाव्वन चाळ हा परिसर रेल्वे हद्दीमध्ये येतो.पण पोलीस तपासाची हद्द ही विष्णूनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत येते. या ठिकाणी अनेक मोड कळीस आलेल्या रेल्वे क्वार्टर्स अस्तित्वात होत्या परंतु अलीकडे त्यां तोडण्यात आल्या आहेत. तर ज्या क्वार्टमध्ये कर्मचारी राहात आहेत, त्याच अस्तित्वात आहेत. परंतु बावन्न चाळ ही कु-प्रसिद्ध म्हणूनच प्रसिद्ध आहे .कारण याठिकाणी नशेडी ,दारुडे अशी मंडळी रात्रीच्या काळोखात रेल्वेच्या मैदानाच्या लगतच्या भिंती जवळ व पडक्या खोल्यांमध्ये तसेच झाडी झुडपात बसून नशा करीत असत. पूर्वी या ठिकाणी अनेक गुन्हे घडलेले आहेत. एक प्रकारे हा परिसर म्हणजे नशेडी लोकांसाठी एक आदंणच होते. असे म्हटल्यास वावगे ठरू नये परंतु अलीकडे पोलीसांनी या परिसराकडे लक्ष दिल्याने ते प्रमाण खूपच कमी झालेले आहे.या ठिकाणी खूनासारखे प्रकार ही घडलेले आहेत.



पो.निरी.(क्राईम) **राहूलकुमार खिलारे**



पो.निरी.(प्रशासन) **मोहन खंदारे**



स.पो.निरी. **गणेश वडणे**

याच ठिकाणी पूर्व व पश्चिम भागाला जोडणारा पुल असल्याने या ठिकाणी सायंकाळी पोलीस हमखास असतातच व बीट मार्शलही या ठिकाणी फेरफटका मारत असल्याने अशा नशा करणाऱ्या लोकांची मोठी पंचाईत झाली आहे.आता जरी हा परिसर मोडक्या रेल्वे क्वार्टर्स पासून मुक्त झाला असला तरी या विभागात झाडे-झुडपे मोठ्या प्रमाणात आहेत .याचाच फायदा अशा या नशा करणाऱ्या व गर्दुल्या उर्वरीत पान नं.२ वर...

## पैशासाठी वेठीस धरुन त्रास देणाऱ्या प्रेयसीची हत्या ; प्रियकर पोलीस कर्मचाऱ्यासह मेव्हणा गजाआड

क्राईम बॉर्डर न्यूज नेटवर्क

**उल्हासनगर**: उल्हासनगर कॅम्प नंबर ५ मधील कैलास कॉलनी नजीक असलेल्या स्मशान भूमी जवळ घडली. खळबळजनक बाब म्हणजे प्रेयसीच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी आरोपीचा मेव्हणा स्मशानभूमी नजीक आला होता. याप्रकरणी हिल लाईन पोलीस ठाण्यात विविध कलमानुसार गुन्हा दाखल करून दोघा आरोपीना अटक केली आहे. सचिन गोरखनाथ खाजेकर वय ३९ रा. सुभाष टेकडी, उल्हासनगर असे हत्येप्रकरणी अटक प्रियकराचे नाव आहे. तर गुन्ह्यात मदत करणारा कल्पेश उर्फ केशव खैरनार वय ३१रा. वीर तानाजी नगर, उल्हासनगर असे मेव्हण्याचे नाव आहे. तर आशा बाजीराव मोरे (वय ५१,रा. औरंगाबाद) असे हत्या झालेल्या प्रेयसीचे नाव आहे.

**पैशांसाठी वारंवार वेठीस धरून त्रास देणाऱ्या प्रेयसीची पोलीस कर्मचारी असलेल्या प्रियकराने हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.**



दोघांचे जुळले होते प्रेमसंबंध - आरोपी सचिन हा ठाणे पोलीस आयुक्त कार्यलयात पोलीस कर्मचारी म्हणून कार्यरत आहे. तर मृतक आशा औरंगाबादमधील एका रुग्णालयात नर्स म्हणून कार्यरत होती. आरोपी सचिनची औरंगाबादमधील एका पोलीस ठाण्यात नेमणूक होती. त्यावेळी या दोघांमध्ये प्रेमसंबंध होऊन शारीरिक संबध प्रस्थापित झाले. विशेष म्हणजे आरोपी सचिन हा विवाहित आहे. त्यातच मृत प्रेयसी गेल्या काही दिवसांपासून आरोपी प्रियकराला वारंवार पैश्यांसाठी वेठीस धरून त्रास देत होती. तसेच औरंगाबाद सोडून उल्हासनगर राहण्यास तगादा लावत होती. त्यामुळे प्रियकर पोलीस कर्मचाऱ्याने मंगळवारी रात्रीच्या सुमारास बहाण्याने बोलवून तिला स्वत:च्या वॅग्नर कार मध्ये बसवले. त्यानंतर मध्यरात्रीच्या सुमारास कारमध्येच तिचा गळा आवळून हत्या केली. मृतदेहाची विल्हेवाट लावण्या आदीच दोघेही आरोपी ताब्यात हत्येनंतर तिच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी आरोपीने त्याचा मेव्हणा कल्पेश उर्फ केशव याला स्मशानभूमी जवळ बोलावले होते. मात्र, स्मशान नजीक एका ढाब्यावर उभ्या असलेल्या कारमध्ये महिलेचा मृतदेह असल्याची खबर विठ्ठलवाडी पोलिसांनी मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन वॅग्नर कारमधून महिलेचा मृतदेह ताब्यात घेतला. शिवाय दोन्ही आरोपीना घटनास्थळी ताब्यात घेऊन दोघांना हिल लाईन पोलिसांच्या स्वाधीन केले. हिललाईन पोलीस ठाण्यात दोघांवर भादंवि कलम ३०२, २०१, ५११, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली. दोन्ही आरोपीना न्यायालयात हजर केले असता आरोपींना पोलीस कोठडी सुनावली आहे. सदर पुढील तपास पोलीस करत आहेत.

★★★

## : संस्थेची घोडदौड :

## क्राईम रिपोर्टर वेल्फेअर असोसिएशन च्या

## ९ व्या वर्धापन दिना निमित्त विविध ठिकाणी शालेय साहित्य वाटप कार्यक्रमाचे आयोजन

क्राईम बॉर्डर न्यूज नेटवर्क

डोंबिवली:(मुख्य कार्यालय) : क्राईम रिपोर्टर वेल्फेअर असोसिएशन (एनजीओ) या सामाजिक संस्थेची स्थापना दि.१४ जून २०१३ रोजी श्री.राजेंद्र वखरे यांनी केली असून सदर संस्था ही वर्षभर विविध सामाजिक उपक्रम राबवित असते.

विशेषत:आदिवासी विद्यार्थ्यांसाठी दरवर्षी ठाणे जिल्ह्यातील विविध शाळांमधून संस्थेतर्फे शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात येते.त्याचबरोबर आदिवासी,कातकरी, वीट भट्टी कामगार यांच्यासाठी वीटभट्टीवर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

त्याचबरोबर महाराष्ट्रातील विविध संस्थांना विशेष करून ज्या ठिकाणी अनाथ मुली, मुले राहतात तसेच वृद्धाश्रमांना,NAB अंध व्यक्तींच्या आश्रमांना, विविध संस्थांना साहित्य पुरवीत असते.

त्याच बरोबर संस्थेतर्फे समुपदेशन उपक्रम राबविला जातो,घरगुती भांडणं सोडवली जातात,घटस्पोट मागणाऱ्या कुटुंबांचा समेट घडवण्याचा प्रयत्न संस्था सातत्याने करीत आहे. वृक्ष लागवड व संवर्धन ब्लँकेट वाटप, मुक्या प्राण्यांना अन्न पुरवणे त्यांची देखभाल करणे.

महिलांमध्ये जनजागृती निर्माण करून त्यांना पोलुस स्टेशन व इतर ठिकाणी नेऊन त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे, विविध राष्ट्रीय सण साजरे करणे असे एक ना अनेक उपक्रम संस्था गेल्या नऊ वर्षापासून अविरतपणे राबवित आहे.

नैसर्गिक संकटात संस्थेने सांगली सातारा,चिपळूण आदी ठिकाणी अन्नधान्य व गृहोपयोगी वस्तू पुरविले आहेत.

**यावर्षी संस्थेचा ९ वा वर्धापन दिन दि.३१जुलै २०२२पर्यंत साजरा करण्यात येणार आहे**

यामध्ये महाराष्ट्रातील पाच जिल्ह्यात संस्थेचे पदाधिकारी व स्वयंसेवक आदिवासी पाड्यातील शाळा व विद्यार्थ्यां साठी शैक्षणिक साहित्य व कपडे, छत्र्या, रेनकोट वाटप करणार आहेत.

ज्यांना या उपक्रमात सहभागी व्हायचे आहे अशांनी पुढील मोबाईल क्रमांकावर ९६१९६३००३५संस्थेच्या मुख्य कार्यालयाची संपर्क साधावा असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात येत आहे.

**संस्थेने १४ जून २०१३ पासून खालील प्रमाणे आत्तापर्यंत राबविलेले उपक्रम खालील प्रमाणे**

Estd. - 14-06-2013

१) नैसर्गिक संकटात सापडलेले अतिवृष्टीमुळे डोंगराखाली सापडलेल्या माळीन गावाचे पुनर्वसन झाले त्यानंतर तेथील शाळेतील विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले.

२) कोल्हापूर,सांगली, सातारा, राजापूर, सैनिक टाकळी या ठिकाणी नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्या पूरग्रस्तांना अन्नधान्य व गृहपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात आले.

३) मातोश्री वृद्धाश्रमातील आजी-आजोबांसोबत काव्यसंमेलन व संस्थेचा वाढदिवस साजरा करून साहित्य वाटप करण्यात आले.

४) कोकणातील चिपळूण व परिसर अतिवृष्टीमुळे संकटात सापडला होता तेव्हा संस्थेतर्फे अन्नधान्य व गृहपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात आले.

५) पुणे जिल्ह्यातील स्नेहवन या संस्थेत आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची मुले शिक्षण घेत आहेत त्यांना शैक्षणिक साहित्य वाटप.

६) पुणे येथील रेड लाईट एरियातील मुलांचे संगोपन करणारी खिलजी संस्था तिला शैक्षणिक साहित्य व फळ वाटप कार्यक्रम

७) टिटवाळा येथे अनाथ मुलींच्या परिवर्तन आश्रमातील मुलींसाठी आवश्यक व शैक्षणिक साहित्य वाटप

८) भारतातील पहिली पुणे जिल्ह्यातील लोणावळा येथील ँलायन्स होम फॉर ब्लाइंड खंडाळा येथील अंध बंधू-भगिनी साठी साहित्य व धान्य,फळ वाटप.

९) जळगाव येथे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करून समाजातील विविध समाज सेवकांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले व विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्यात आला.सन २०१३

१०) जळगाव येथे पोलीस दलातील अधिकारी यांचा व समाजसेवकांचा सन्मान सोहळा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन.सन २०१७

११) डोंबिवली नगरीत स्टेट लेवल अवार्ड २०१३

१२) डोंबिवली नगरीत स्टेट लेव्हल डॉक्युमेंट अवार्ड व सोशल कल्चरल प्रोग्राम सन २०१५ सावित्रीबाई फुले नाट्य मंदिर

१३) डोंबिवली नगरीत स्टेट लेव्हल अचीव्हमेंट अवॉर्ड सोशल कल्चरल प्रोग्राम चे आयोजन विविध मान्यवरांचा सन्मान सोहळा व कलाकारांना वाव सन२०१८ जानेवारी

१४) डोंबिवली नगरीत स्टेट लेव्हल अचीव्हमेंट अवॉर्ड सोशल कल्चरल प्रोग्राम चे आयोजन विविध मान्यवरांचा सन्मान सोहळा व कलाकारांना वाव सन२०१८ जानेवारी

१५) डोंबिवली नगरीत स्टेट लेव्हल अचीव्हमेंट अवॉर्ड सोशल कल्चरल प्रोग्राम चे आयोजन विविध मान्यवरांचा सन्मान सोहळा व कलाकारांना वाव सन२०१८ जानेवारी

१६) सन २०१८ नोव्हेंबर मध्ये यशोगाथा कार्यक्रमाचे आयोजन व महाराष्ट्राची संस्कृती जतन कार्यक्रम

१७) संस्थेतर्फे जर्नालिझम ट्रेनिंग घेऊन - सन्मानपत्र कार्यक्रम व सन्मान सोहळा

१८)नव पत्रकारांसाठी आकाश वाणी,मंत्रालय, प्रिंटिंग प्रेस आदी ठिकाणी कार्यशाळेचे आयोजन

१९) डोंबिवली शहरा जवळील वृद्धाश्रमात फळं व साहित्य वाटप

२०) शहापूर तालुक्यातील आदिवासी शाळांमध्ये भेट देऊन शैक्षणिक साहित्याचे वाटप

२१) रस्त्यावर व रेल्वे स्टेशनवर सापडलेल्या मुलांचा सांभाळ करणारी खडवलीतील पसायदान संस्थाला शैक्षणिक साहित्य व खाऊ वाटप.

२२) पुणे जिल्ह्यातील स्नेहवन संस्थेला शैक्षणिक साहित्य वाटप व फळे वाटप व प्रबोधन.


२३) लोणावळा येथील कॉन्व्हेंट हायस्कूल येथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन कार्यक्रम व मैगझिन वृत्तपत्र बांधणी मार्गदर्शन कार्यक्रम.

२४) दिवा येथील जीवन दीप शैक्षणिक संस्थेच्या शाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व प्रबोधन

२५)अंबरनाथ तालुक्यातील कमलधाम वृद्धाश्रमला भेट

२६) पसायदान संस्था खडवली

उर्वरीत पान नं.३वर...

॥श्री स्वामी समर्थ॥

॥भिऊ नकोस, मी तुझ्या पाठिशी आहे॥

शैक्षणिक,सामाजिक,सांस्कृतिक,आरोग्य व क्रिडा (बहूद्देशीय)

**क्राईम रिपोर्टर वेल्फेअर असोसिएशन**

Regd. No.F/28611/Thane

No.PN/CIT(Exempt.)/Tech/80G/23/2017-18/620

NGO

TAX BENEFITS

Crime Reporter WelfareAssociation

80 G

Your contribution are eligible for tax benefit under section 80G

मार्गदर्शक : डी.डी.गवारे सो. अप्पर पोलीस अधिक्षक (ACB)

**आयकराच्या ८० जी कलमान्वये देणगीस सुट**

तमाम दात्यांना आवाहन करण्यात येते की, क्राईम रिपोर्टर वेल्फेअर असोसिएशन (एनजीओ)व क्राईम बॉर्डर (वृत्तपत्र) च्या माध्यमातून नियोजित प्रकल्प ॲब्यूलन्स, वस्तीगृह, वृद्धाश्रम, ग्रंथालय, एमपीएससी व यूपीएससी च्या विद्यार्थ्यांसाठी निवास व अभ्यासिका या सामाजिक उपक्रमासाठी देणगी देवून या सामाजिक उपक्रमात आपण सहभागी व्हावे. सदरच्या देणग्या देणाऱ्या देणगीदारांना त्यांनी दिलेल्या देणगीस आयकरातून सवलत मिळावी यासाठी आयकर अधिनियम १९६१ च्या कलम ८० जी अन्वये सवलत देण्यात आली आहे. सदर तरतूदीमुळे देणगीदारांना याचा फायदा होतो. या ८० जी कलमाच्या सवलतीचे सर्टिफिकेट आयकर आयुक्त, पुणे यांच्याकडून प्राप्त झाले आहे.

संस्थापक : राजेंद्र वखरे - कल्याण 9619630035 / 7039060555 / 9987496136

# एका टोपीमुळे उकलले हत्येचे गूढ दारुच्या नशेत मित्रांने केला मित्राचा निर्घुन खून !

पान नं. १ वरुन ...लोकांना अजूनही होतो. डोंबिवली प.रेल्वे स्टेशन जवळच रेल्वेचे मोठे एक मैदान आहे. याठिकाणी या विभागातील मुलं क्रिकेट खेळण्यासाठी येत असतात विशेष म्हणजे इथे क्रिकेटचे सामने अधूनमधून भरत असतात.अशाच प्रकारे या ठिकाणी गेल्या काही महिन्या पासून एक जण याच विभागा तील एका ठिकाणी एका आडोशाला राहत होता .त्याने ती जागा आपली एक तोडकी-मोडकी बॅक व काही फाटके-तुटके कपडे एका दोरी वर लटकवून ती जागा अनभिषिक्तपणे अडवली होती. तो मात्र दारूची नशा काही शांत बसू देत नव्हती. त्याने त्याच्या मित्राला शिवीगाळ करायला सुरुवात केली आणि त्या शिव्या ऐकून दुसरा मित्र सुद्धा त्याला प्रत्युत्तरादाखल शिव्या देऊ लागला. त्या दोघांची भानगड आता शिव्या वरून हातापायी वर आली होती.तसे पाहता अर्जुन हा तरुण होता त्याने मागचा पुढचा विचार न करता आपल्यापेक्षा पाच दहा वर्ष वयाने मोठ्या असलेल्या आपल्या मित्रास चापटी व बुक्क्याने मारायला सुरुवात केली.

अर्जुन मात्र पूर्णपणे दारूच्या नशेत होता. त्याला आपला मित्र आपल्याला शिवीगाळ करतो आहे. पाहणी केली असता तो इसम मयत झाल्याचे त्यांच्या लक्षात आले.तात्काळ या घटनेची माहिती व. पो. निरी. पंढरीनाथ भालेराव यांना देण्यात आली असता ते घटनास्थळी आले.व त्यांनी पाहणी केली .या घटनेची माहिती कल्याण परिमंडळ ३ चे पोलीस उपायुक्त सचिन गुंजाळ,डोंबिवली विभागाचे एसीपी सुनील कुराडे यांना देण्यात आली. ताबडतोब वरिष्ठांनी घटनास्थळी धाव घेतली.मयताची व घटनास्थळाची पाहणी करून त्यांनी व.पो. निरी. पंढरीनाथ भालेराव यांना तातडीने मार्गदर्शन करुन काही सुचना देत अज्ञात रोज माझ्या कडे प्लॅस्टिक व भंगार गोळा करून विकायला येत असतो.यावर पोलीस म्हणाले की,तो जेव्हा इकडे येईल तेव्हा त्याला थांबवून ठेव आणि आम्हाला कळव .काही वेळानंतर तो इसम भंगारवाल्याकडे आला तेव्हा भंगार वाल्याने त्याला चहा देऊन थांबविले आणि त्या संशयित इसमाला भंगार वाल्याचा संशय आला व त्याने तेथून पळ काढला सदर बाब पोलीसांना समजली. सर्व पोलीस अलर्ट झाले डोंबिवली पश्चिमेतील दींनयाल रोडवर तो इसम फिरत असल्याची माहिती पोलीसांना मिळाली आणि पोलीसांनी तात्काळ मात्र त्याला तंतोतंत लागू पडली आणि त्याने कबूल केले की साहेब हो माझ्या हातून चूक झाली आहे .मीच त्याला मारले आहे आणि त्याला पश्चाताप होऊ लागला. साहेब दारूच्या नशेत माझ्याकडून त्याला लाकडी फळीने मारले गेले त्याला मारून टाकावे असा माझा विचार नव्हता परंतु माझ्या हातून चूक झाली आणि क्षुल्लक कारणावरून एका माणसाचा जीव गेला हे त्याने पोलीसांकडे कबूल केले.

पोलीसांनी कॅप, दारू, भानगड आणि मर्डर या धाग्यावरून अवघ्या बारा तासात पोलीसांनी



पो.उप.निरी.कुलदीप मोरे, म.पो.उप.निरी.कपिले, पो.उप.निरी.अमोल आंधळे, ए.एस.आय.सावंत, पो.हवा. युवराज तायडे, पो.हवा.घोलप, पो.हवा.जमादार, पो.हवा.थोरात,पो.ना.पवार

दिवसभर इकडे तिकडे भटकून प्लॅस्टिक, भंगार गोळा करून ते विकून दारु पिऊन रात्री झोपायला त्याठिकाणी येत असे.दिनांक १३ जून २०२२ रोजी रेल्वे मैदानावर काही मुलांनी क्रिकेटचे सामने भरवले होते या क्रिकेट शौकिनांनी क्रिकेट चे सामने संपल्यानंतर जेवणाचा बेत आखला होता. त्या सर्वांनी क्रिकेट या खेळाचा आनंद लुटून चिकन बिर्याणीवर ताव मारला परंतु चिकन बिर्याणी जास्त व खाणारे कमी त्यामुळे बिर्याणी उरली आता या बिर्याणी चे काय करायचे ? याचा ते विचार करत असतानाच त्यांच्या लक्षात आले की या ठिकाणी जे कोणी असतील त्यांना आपण ती देऊन टाकू. तसे पाहता रात्रीच्या काळोखात नशा करणाऱ्यांची पावले आपोआपच बाव्वन चाळीकडे वळत असतात. हा रस्ता त्यांचा तोंडपाठ झाला असल्याने दिवसभर भटकून केर कचरा उचलून, प्लास्टिक, भंगार गोळा करुन ते सायंकाळी विकायचे व त्यातून दारू व चकणा विकत घ्यायचा व एका बाटलीत पाणी भरून ही मंडळी ठराविक जागी बसून दारूचा आस्वाद घेत असतात.अशाच प्रकारे एका ठिकाणी एक इसम याचा प्रचंड राग आला आणि त्या रागाच्या भरात त्याने आजूबाजूला काही मारायला मिळते का हे बघितले असता त्याला एक लाकडी फळी दिसली. त्याने ती बॅटे सारखी उचलली व बॅटेने चेंडू मारावा तशा पद्धतीने त्याने ती लाकडी फळी आपल्या मित्राच्या डोक्यात हाणली आणि त्यानंतर त्याने त्या लाकडी फळीने त्याला झोडपायला सुरुवात केली. हे पाहून मित्राने अर्जुनला आवरायचा प्रयत्न केला व मारू नको म्हणून त्याला सांगू लागला तेव्हा अर्जुनने आपल्या मित्राला सुद्धा धक्का देऊन लांब केले व मध्ये पडलास तर तुला पण खल्लास करीन असा दम दिल्याने तो घाबरला व बाजूला उभा राहिला . अर्जुनचा मित्र दारूच्या नशेत असल्याने त्याला प्रतिकार करता येत नव्हता परंतु तो शिव्या देत होता आणि याच गोष्टीचा राग अर्जुनला जास्त येत असल्याने तो मारहाण करत होता. त्या माराने तो मित्र जोरजोराने ओरडत होता तर अर्जुन लाकडी फळीने त्याच्या तोंडावर, डोक्यावर, पाठीवर ,हातावर ,मिळेल त्या ठिकाणी लाकडी फळीने प्रहार करत होता.एक प्रहार त्या इसमाच्या मागच्या बाजूला डोक्याला लागला आणि तो आरोपींना पकडण्याचे आदेश दिले. सदर खुनाचा तपास व. पो. निरी. पंढरीनाथ भालेराव यांनी स्वत:कडे घेत तपास आरंभला.घटनास्थळावरून एक जांभळी कॅप, तोडकी-मोडकी बॅग, रक्ताने माखलेली लाकडी फळी ,दारुच्या बाटल्या, रक्तमिश्रित माती अशा वस्तू इनक्वेस्ट पंचनाम्यात जप्त करून सदर मृतदेह राणी रुक्मिणीबाई रुग्णालय, कल्याण येथे पुढील कारवाईसाठी पाठवण्यात आला. घटनास्थळाची बारकाईने पाहणी केली असता पोलीसांच्या असे लक्षात आले की ,सदर घटना ही दारूच्या नशेत मित्रांमध्ये घडली असावी. त्या व्यतिरिक्त दुसरे असे काही कारण त्यांना दिसत नव्हते. त्यांच्यात प्रॉपर्टी किंवा दुसरे कोणते सबळ कारण नसल्याने हा मर्डर दारूच्या नशेत मित्रा मित्रांनीच केला असावा इथपर्यंत पोलीसांनी अंदाज बांधला.पोलीसांनी या परिसरात बसवलेले सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे फुटेज तात्काळ तपासायला घेतले आणि गुन्हे प्रकटीकरण विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांना तात्काळ परिसरात पाहणी करून काही धागादोरा मिळतो का ?यासाठी तपासाला लावले. आणि खबरेही त्याला ताब्यात घेतले.

पोलीसांना घटनास्थळावरून कॅप मिळाली होती. फुटेजमध्ये कॅप घालणारी व्यक्ती दिसल्याने पोलीसांना त्या पहिल्या इसमावर संशय आला व त्यांनी त्याला पकडण्यासाठी फिल्डिंग लावली आणि एकदाचा तो पकडला गेला त्याला पोलीस ठाण्यात आणल्यावर त्याला विचारले की तू कॅप घालतो का व तुझ्याकडे किती कॅप आहेत यावर तो म्हणाला की हो मी कॅप घालतो व माझ्याकडे दोन कॅप आहेत.तेव्हा त्या कॅप कुठे आहे असे विचारले तर तो म्हणाला की माझी कॅप माझ्या बॅगेत आहे. त्याने त्याची बॅग उचकटून दाखवली. परंतु त्यामध्ये एकच कॅप होती दुसरी त्याला सापडत नव्हती. पोलीसांनी घटनास्थळावर सापडलेल्या जांभळी कॅपचा फोटो त्यांला दाखविला व विचारले हीच तुझी कॅप आहे का ? त्यावर तो म्हणाला साहेब ही माझीच असे राकेश पाटील म्हणाला . त्यानंतर त्याच्याकडे सदर खुना बाबत चौकशी करण्यात आली परंतु तो ताकास तूर लागू देत नव्हता त्याला खास पोलीसी खाक्या दाखवला असता तो म्हणाला की साहेब मी त्याचा सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे अवघ्या बारा तासात आरोपीला पकडले तर साक्षीदारानेही सांगितले की साहेब माझ्या समोरच अर्जुनने सदर इसमाला मारले मी त्याला अडवण्याचा प्रयत्न केला परंतु त्याने माझे ऐकले नाही अर्जुन पळून जाण्याच्या बेतात होता पण त्याचा बेत फसला.

मयत अद्याप कोण व कुठला ? याची माहिती पोलीसांना कळू शकली नाही.आरोपी अर्जुन आनंदा मोरे वय वर्षे ३८ धंदा बिगारी काम हा मूळ गाव उर्दी, तालुका पन्हाळा ,जिल्हा कोल्हापूरचा असून पूर्वी त्याचे कुटुंब बांद्रा येथे राहत होते .त्याची आई वडील दोघेही वारले तर त्याची बायको त्याला सोडून गेली आहे. त्यामुळे तो डोंबिवली पश्चिमेतील नवापाडा येथे गेल्या आठ ते दहा वर्षापासून त्याच्या बहिणीकडे आला होता मिळेल ते काम तो करत होता परंतु कोरोनाच्या काळामध्ये त्याची बहीण सुद्धा देवाघरी गेली आणि मग तो रस्त्यावरच गुजराण करू लागला. दिवसभर कचरा, प्लास्टिक, भंगार गोळा करणे व संध्याकाळी विकून त्यातून दारू पिऊन झोपणे या पलीकडे त्याचा काही एक काम धंदा नव्हता.तर मयत



पो.ना.विक्रम गवळी, पो.ना. कांगुणे, पो.ना. तुलशीराम लोखंडे, पो.ना. कुरणे, पो.ना.भोई, पो.ना. तडवी, पो.शि. कुदंन भामरे, पो.शि. रायशिंग, पो.शि. कमोदकर

वय अंदाजे ४५ ते ५० हा दि.१३ जून २०२२ रोजी नेहमीप्रमाणे दारू पीत बसला होता. तर त्याच्याच थोड्या अंतरावर दोन इसम दारू पीत बसले होते. त्यांना पाहून या क्रिकेट मैदानावरील एकाने त्यांच्यापैकी एकाला बोलावले व त्याला उरलेली बिर्याणी खायला दिली. ती बिर्याणी बघून या दोघांच्या तोंडाला पाणी सुटले आणि आपण येथेच्छपणे या बिर्याणीवर ताव मारू असा त्यांनी विचार केला व पुन्हा ते एक चपटी दारुची बाटली घेऊन आले.त्यानंतर हळू हळू ती दारू रिचवत बसले. कारण आज त्यांची मजाच झाली होती. दारू सोबत बिर्याणीची पार्टी त्यांना मिळाली होती. दारू पीत व बिर्याणी खात असतांना ते एकमेकांशी गप्पा मारु लागले. थंड हवेच्या झुळके मध्ये दारूची नशा हळूहळू चढत होती रात्री साधारणत: अकरा-साडे अकरा वाजले असावेत. त्यानंतर त्या तिघांनी दारूच्या नशेत विविध विषयावर बोलायला सुरुवात केली विषयावर विषय निघत गेला.त्या तिघांपैकी दोघे जणच बिर्याणी खात होते,तर तिसरा मात्र दारू आणि चखण्यावरच संतुष्ट होता आणि त्याचा हा दिनक्रम ठरलेला होता.शुल्लक कारणावरून दोघा मित्रांमध्ये शाब्दिक भानगड सुरु झाली या भानगडी चे स्वरूप हळूहळू वाढत गेले.या ठिकाणी दारू पीत असलेला अर्जुन आनंदा मोरे याला मात्र दारुचा अंमल जास्त चढला होता. तो हवेत तरंगत असल्याने आपल्या एका मित्राशी मुद्दामच भानगड उकरून काढत होता. त्यांच्यात भांडण वाढले तसे त्यांचा मित्र राकेश पाटील त्या दोघांना भानगडी करू नका रे !गपचूप खा आणि झोपा असा सल्ला त्यांना देत होता पण अर्जुनला धपकन जमिनीवर पडला. त्याच्या डोक्यातून रक्तस्राव सुरु झाला .ते पाहून हे दोघेही घाबरले तरीही दोन-चार फटके अर्जुनने पुन्हा त्याला दिले व तेथून पळ काढला. दारूच्या नशेत आपल्या हातून आपल्या मित्राला जास्तच मारले गेले असे अर्जुनला वाटू लागले परंतु आता विचार करून फायदा नव्हता त्यांना वाटले की ,सकाळी तो उठेल व नंतर आपण काय करायचे ते पाहू असे म्हणून ते तेथून पळाले व जवळच असलेल्या भागशाळेच्या मैदानामध्ये येऊन झोपले. डोंबिवली पश्चिम बावन्न चाळ येथील क्रिकेट मैदानाच्या दक्षिण बाजूच्या कंपाऊंडच्या भिंतीलगत सदर हाणामारी करून अर्जुन पळून गेला होता. सदर मैदानात फेरफटका मारण्यासाठी आलेल्या एका दक्ष नागरिकाचे लक्ष निपचित पडलेल्या इसमाकडे गेले त्याला संशय आल्याने तो त्याच्याजवळ गेला पाहतो तर काय तो इसम रक्ताच्या थारोळ्यात निपचित पडला असून तो काही एक हालचाल करत नसल्याचे त्याच्या लक्षात आले आणि त्याने तात्काळ विष्णूनगर पोलीसांना सदर घटनेची माहिती दिली.

विष्णूनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंढरीनाथ भालेराव यांनी ताबडतोब पो.निरी.(गुन्हे) राहुलकुमार खिलारे, पो.निरी.(प्रशा.) मोहन खंदारे यांना खरा काय प्रकार आहे. याची शहानिशा करण्यासाठी त्याठिकाणी पथकासह पाठवले.पोलीस पथक डोंबिवली पश्चिम येथील रेल्वे मैदानात आले व त्यांनी पाहणी केली असता मैदानाच्या भिंतीजवळ एक इसम खरोखरच रक्ताच्या थारोळ्यात पडलेला त्यांना दिसला. त्यांनी बारकाईने त्याची माहिती काढण्यासाठी लावले.यासाठी तीन पोलीस पथके तयार करण्यात आली या पथकांना विविध काम वाटून देण्यात आले.वपोनि.पंढरीनाथ भालेराव यांच्या नेतृत्वाखाली,पो.नि.(गुन्हे) राहुरकुमार खिलारे,पो.नि.(प्रशा.) मोहन खंदारे,सहा.पो.निरी. गणेश वडणे, पो.उप.निरी. कुलदिप मोरे यांचे पथक कार्यरत झाले. स. पो. निरी.गणेश वडणे यांचं पथक डोंबिवली पश्चिम रेल्वे स्टेशन परिसरात तर पो.उप.निरी.कुलदिप मोरे यांचे पथक बावन्न चाळ,पो.नि.राहुलकुमार खिलारे यांचं पथक डोंबिवली पूर्व गणेश मंदिर विभागात,पो.नि.मोहन खंदारे हे टिमसह मोठागाव ,खाडी परिसर विभागात काही धागा मिळतो का याची चाचपणी करू लागले. घटनास्थळाजवळील स्ट्रीट वरील सीसीटीव्ही फुटेज पोलीसांनी प्राप्त केले.विशेष म्हणजे पोलीस तपास सुरु असतांना आरोपी हा पोलीसांसोबत फीरत होता एवढेच नव्हे तर पोलीसांनी दिशाभूल करण्यासाठी चुकीची माहिती देऊन तपास भरकटवत होता. पण शेवटी पोलीस ते पोलीसच असतात.पोलीसांना घटनास्थळी दारुच्या बाटल्या भेटल्या असल्याने फुटेज मधील इसमांना वाईन शॉप वाले ओळखू शकतात.त्या अनुशंगाने तपास आरंभला असता एका वाईन शॉप वाल्याने सांगितले की साहेब यातील इसम हे रोज दारू घ्यायला येतात. तर दुसरीकडे डोंबिवली परिसरातील भंगार घेणारे दुकानदार यांच्याकडे चौकशी केली असता डोंबिवली पूर्व गणेश मंदिराजवळील भंगार घेणाऱ्या इसमाला फुटेज दाखवले असता.त्यातील लंबू दिसत असणाऱ्या इसमाला पाहून तो म्हणाला की साहेब हा इसम खून केलेला नाही ?. त्याचा खून अर्जुनने केलेला आहे. त्यानंतर पोलीसांनी अर्जुनचा शोध सुरू केला.

पोलीसांनी फुटेज मध्ये असलेल्या फोटो मध्ये अर्जून कोण आहे असे त्या पकडलेल्या लंबूकडे विचारले असता त्याने अर्जुनला ओळखले विशेष म्हणजे पोलीस शिपाई कुंदन भामरे यांना तो इसम म्हणजेच अर्जुन हा भेटला होता व त्याने पोलीसांची




दिशाभूल केली होती. हे भामरे यांच्या लक्षात आले होते. त्यांनी त्या आरोपीला बघितले होते .त्यामुळे त्याला पकडणे आता अवघड नव्हते परंतु दुसरीकडे अर्जुन हा त्याचे कपडेलत्ते घेऊन बॅग भरून पळून जाण्याच्या तयारीत होता पण पोलीसांनी त्याला पकडण्यासाठी एक प्लान रचला व तो कुठे मिळू शकतो याची खात्री करून त्याठिकाणी पोलीसांचा गुप्त सापळा रचला

दिवसभर अर्जुन इकडे तिकडे फिरला व दुसऱ्या दिवशी त्याने इथून पळून जाण्याचा बेत रचला. तो रात्री भाग शाळा मैदानामध्ये झोपायला आला आणि पोलीसांच्या सापळ्यात अडकला.

त्याला पोलीस ठाण्यात आणले पोलीस ठाण्यात आणल्यानंतर त्याच्याकडे चौकशी केली असता तो काही एक सांगत नव्हता परंतु पोलीसांनी त्याला खास पोलीसी पाहुणचार दिला आणि ही इसम हा डोंबिवली पूर्वेतील काही भागात फिरायचा परंतु अलीकडे तो दारू पिण्यासाठी व झोपण्यासाठी बावन्न चाळीमध्ये येत असे. मयत हा पेंटिंग चे काम करत असल्याची माहिती समोर आली असून पोलीस त्यानुसार तपास करीत आहे.अर्जुन आनंदा मोरे वय ३९ याच्याविरुद्ध विष्णुनगर पोलीस ठाण्यात गु. रजि. नं. १६२/२०२२ भारतीय दंडविधान कायदा कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला कोर्टात हजर केले असता कोर्टाने त्याला पोलीस कोठडी सुनावली आहे.

या गुन्ह्यासंदर्भात कल्याण परिमंडळ - ३ चे पोलीस उपायुक्त सचिन गुंजाळ, डोंबिवली विभागाचे सहायक पोलीस आयुक्त सुनील कुराडे यांच्या मार्गदर्शनाखाली विष्णुनगर पोलीस ठाण्याचे व. पो. निरी.पंढरीनाथ भालेराव त्यांच्या नेतृत्वाखाली तसेच पो. निरी. (गुन्हे) राहुलकुमार खिलारे पो. निरी. (प्रशासन) मोहन खंदारे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश आर वडणे, पो.उप.निरी.कुलदिप मोरे,म.पो.उप.निरी.एम.बी. कपिले,परि.पो.उप.निरी. आंधळे, एएसआय. सुभाष नलावडे, मनोज सावंत,पो.हवा. शकील जमादार ,कैलास घोलप,पो.हवा.युवराज तायडे, हरिष थोरात,पो.ना.विक्रम गवळी, तुळशीराम लोखंडे, सचिन कांगुणे, संतोष कुरणे, शशिकांत भोई, शकील तडवी,पोलीस शिपाई कुंदन भामरे, रायसिंग चालक पो. शि.कमोदकर यांनी परिश्रम घेतले.★★★

- राजेंद्र वखरे

# : संस्थेची घोडदौड :

# क्राईम रिपोर्टर वेल्फेअर असोसिएशनची

## ९ व्या वर्धापन दिना निमित्त विविध ठिकाणी शालेय साहित्य वाटप कार्यक्रमाचे आयोजन

पान नं.१ वरुन... येथे पुन्हा शैक्षणिक साहित्य वाटप व विद्यार्थ्यां सोबत विरंगुळा कार्यक्रम

२७) शिवनेरी व सिंहगड किल्ले भ्रमंती व स्वच्छता मोहीम

२८) शहापूर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

२९) शालेय परिसरात वृक्षारोपण

३०)डोंबिवली शहर व परिसरा तील महिला व मुलींना पोलीस स्टेशन चा कारभार कसा चालतो याची माहिती व प्रात्यक्षिक विष्णुनगर पोलीस स्टेशन

३१)महिला दिनानिमित्त विदर्भातील जळगाव जामोद येथे महिलांचा सत्कार समारंभ व महिलांच्या हक्क जनजागृती कार्यक्रम.

३२) महिला दिनानिमित्त विष्णुनगर पोलीस ठाणे डोंबिवली येथे महिलांचा सत्कार व सन्मानपत्र वाटप

३३) कोरोना काळात पोलीस रेझिंग डे निमित्ताने मास्क वाटप व जनजागृती कार्यक्रम विष्णुनगर पोलीस ठाणे२०२०/आणि २०२१

३४) अंबरनाथ तालुक्यातील आदिवासी पाड्यावर अंबरनाथ पोलीस ठाण्यांच्या अधिकाऱ्यांसमवेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व आदिवासीं कुटुंबाना रेशन वाटप कार्यक्रम सन २०२० व २०२१

३५) अंबरनाथ तालुक्यातील आदिवासी पाड्यावर बोहनोली येथे अंबरनाथ पोलीस ठाण्यांच्या अधिकाऱ्यां समवेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व आदिवासींसाठी रेशन वाटप कार्यक्रम सन २०२१

३६) अंबरनाथ तालुक्यात आदिवासी पाड्यावर आदिवासी दिन साजरा करून गृहपयोगी वस्तूंचे वाटप सह्योग अंबरनाथ पोलीस स्टेशन

३६)जळगाव येथे वारकरी लोकांना अन्नदान

३७) अंबरनाथ तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेच्या मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप व वृक्षारोपण

३८) वरणगाव जिल्हा जळगाव या ठिकाणी गणपती विसर्जनाच्या वेळेस स्वच्छता मोहीम

३९) देशभक्ती कार्यक्रम कॅन्डल मार्च दहशतवाद्यांनी केलेला हल्ला याचा निषेध करून कॅन्डल मार्च काढण्यात आला सहभाग सर अकॅडमी चे विद्यार्थी

४०) दीपावली मध्ये एक पणती सैनिकांसाठी डोंबिवली रेल्वे स्टेशन जवळ कार्यक्रम उपस्थिती डोंबिवली लोहमार्ग पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश पवार व ट्रॅफिक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश जाधव यांची विशेष उपस्थिती

४१) डोंबिवली येथील गणेश मंदिर संस्थान च्या वतीने गुढीपाडवा शोभायात्रा रॅली यामध्ये स्त्रीभ्रूणहत्या चित्ररथ बेटी बचाव, बेटी पढाव संदेश

४२) रायगड जिल्ह्यातील नेरळ पोलीस ठाण्यात इन्चार्ज सपोनिरी. अविनाश पाटील यांच्या विशेष उप स्थितीत रक्षाबंधन व वृक्षारोपण कार्यक्रम व संस्थेच्या संकेतस्थळाचे अनावरण

४३) सिंहगड किल्ल्यावर स्वच्छता मोहीम किल्ले जतन व स्वच्छता मोहीम

४४) कोरोना काळात डोंबिवली परिसरातील पोलीस बंधू भगिनींना मास्क वाटप व चहा बिस्किट फराळाची व्यवस्था

४५)कोरोना काळात भटक्या कुत्र्यांना व पशुपक्ष्यांना अन्न व पाणी पुरविले

४६) कोरोना काळात लोणावळा येथील संस्थेच्या स्वयंसेवक /पदाधिकारी सौ.चित्रा कामत यांनी भटक्या जनावरांना व पशुपक्ष्यांना अन्न पुरविले तसेच आदिवासी महिलांसाठी आवश्यक सामग्री पुरविली

४७) अंबरनाथ तालुक्यातील बोहनोली गावात महिलांसाठी विशेष कार्यक्रम व सॅनिटरी पॅड शैक्षणीक साहित्य व कपडे यांचे वाटप, महिलांच्या समस्या यावर डॉक्टरांचे व्याख्यान

४८)हिवाळ्यात वीट भट्टी काम गारांसाठी त्यांच्या वीटभट्टीवर जाऊन त्यांच्या मुलांना शैक्षणिक साहित्य व त्यांच्यासाठी ब्लँकेट वाटप,भोजन आणि जनजागृती कार्यक्रम

४९) AVK संस्थेच्या सहकार्याने अंध अपंग बांधवांना दिवाळी सण साजरा करता यावा यासाठी रेशन किटचे वाटप २०२१

५०)राजगुरुनगर येथे अपंग युवकाला स्वयंसेवक/पदाधिकारी नितीन सैद यांच्या हस्ते दैनंदिन उदर निर्वाहासाठी एका छोट्या दुकानाचे बांधकाम करून देण्यात आले.

५१)खेड तालुक्यातील राजगुरु नगर येथील मानसिक रुग्णांना शोधून रेहाबिलिटेशन सेंटर मध्ये दाखल करण्यात आले

५२)राजगुरुनगर शहरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

५२)महाराष्ट्राची लोकधारा कार्यक्रमाचे आयोजन

# १२ लाखांची ड्रग्ज जप्त,आरोपीला अटक



क्राईम बॉर्डर न्यूज नेटवर्क

**मुंबई :** माहीम परिसरामध्ये ड्रग्ज तस्करी करणाऱ्यांना माहीम गुन्हे शाखे पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे. पोलिसांना मिळालेल्या माहितीवरून सापळा रचत तस्करी करणाऱ्या आरोपी अहमद शेख वय ६२ याला ११० ग्राम एमडीसह माहीममध्ये पकडले. १२ लाख २५ हजार इतकी जप्त केलेल्या एमडीची किंमत आहे.

'फैसला'पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ड्रग्ज तस्करी प्रकरणात यापूर्वी आरोपी अहमद शेखचा मुलगा आणि मुलीला पोलिसांकडून अटक करण्यात आली होती. त्यानंतर आता त्यांच्या ड्रग्ज तस्कर बापाला देखील माहीम गुन्हे शाखेकडून मंगळवारी अटक करण्यात आली. आज या आरोपीला न्यायालयासमोर हजर करण्यात येणार असून, पोलीस कोठडी मागण्याची शक्यता आहे.माहीम पश्चिमेकडील कनाकिया टॉवरजवळील गल्लीत एक जण एमडीचा साठा घेऊन येणार असल्याची माहिती वरळी युनिटला मिळाली. त्यानुसार पोलिसांनी त्या परिसरावर पाळत ठेवली. दरम्यान अहमद शेख हा एमडी घेऊन तेथे येताच पोलिसांनी त्याला हटकले. तेव्हा पोलीस असल्याचे समजताच अहमदने पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी पकडून त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याजवळ ११० ग्राम एमडीचा साठा मिळाला. हे एमडी त्याने कुठून आणले व ते तो कोणाला विकणार होता, याचा पोलीस शोध घेत आहेत. दरम्यान याआधी वरळी युनिटने अहमदचा मुलगा जावेद ऊर्फ जावा याला एक किलो १५० ग्राम वजनाच्या चरससह पकडला होते.तर, घाटकोपर युनिटने अहमदची मुलगी हजमा हिला १०० ग्राम एमडी आणि दोन किलो ७०० ग्राम चरस साठ्यासह पकडले होते. मुलगा व मुलगी नंतर आता त्यांचा बाप ड्रग्जसह पोलिसांच्या हाती लागला. ★★★

# २० .७९ कोटींची खोटी बिले देणाऱ्यास अटक महाराष्ट्र वस्तू व सेवाकर विभागाची कारवाई

क्राईम बॉर्डर न्यूज नेटवर्क

**मुंबई :** २०.७९ कोटींची खोटी बिले देऊन शासनाचा ५.१२ कोटी रुपयांचा महसूल बुडविल्याप्रकरणी मे. वानकल ट्रेडर्सचा मालक मोहन राजकुमार जांगीड, वय-३६ यांना बुधवार दि.१५ जून रोजी अटक करण्यात आली असल्याची माहिती महाराष्ट्र वस्तू व सेवाकर विभागाने एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

महानगर दंडाधिकारी यांनी मोहन राजकुमार जांगीड यास १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. या कारवाईत अन्वेषण अ, मुंबईचे राज्यकर सहआयुक्त राहुल द्विवेदी, राज्यकर उपायुक्त निळकंठ घोगरे, सहायक राज्यकर आयुक्त योगेश मनाळ, संतोष कुमार राजपूत सहभागी झाले होते.

महाराष्ट्र वस्तू व सेवाकर विभागाने चालू आर्थिक वर्षात आतापर्यंत करचोरीप्रकरणी २० जणांना अटक केली. ★★★

# पर्यटकांच्या सोयीसाठी 'गेट वे ऑफ इंडिया' परिसर आकर्षक करणार - आदित्य ठाकरे



क्राईम बॉर्डर न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबईतील 'गेट वे ऑफ इंडिया' हे पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र आहे. या परिसराचा पर्यटकांच्या सोयीच्या दृष्टीने विकास करून तो अधिक आकर्षक करण्यात येईल, असे पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांनी म्हटले आहे.

गेट वे ऑफ इंडिया परिसराचा विकास करण्यासाठी श्री. ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली. खासदार अरविंद सावंत, पर्यटन विभागाच्या प्रधान सचिव वल्सा नायर, पुरातत्व विभागाचे संचालक तेजस गर्गे आदी यावेळी उपस्थित होते.

श्री. ठाकरे म्हणाले, तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार गेट वे ऑफ इंडियाच्या मुख्य भागाची आणि घुमटाची दुरूस्ती करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर परिसरातील विविध सोयी सुविधांची दुरूस्ती अथवा पुनर्बांधणी करणे गरजेचे आहे. यासाठी परिसरातील सुविधांची सुयोग्य रचना करण्यात येईल. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळ्याचा परिसर आकर्षक करून येथे 'आझादी का अमृत महोत्सव' अंतर्गत ७५ फुट उंचीचा ध्वज उभारण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. सुरक्षारक्षकांची कॅबिन, स्वच्छतागृह, जुने वैभव दर्शविणारे पथदिवे, परिसराची माहिती देणारे फलक, रस्त्याच्या दुभाजकांवर लहान ध्वज लावण्यासाठी खांबांची रचना आदी सुधारणा करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी केल्या.

★★★

# राष्ट्रपती निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर

क्राईम बॉर्डर न्यूज नेटवर्क

**मुंबई :** भारत निवडणूक आयोगाने आज राष्ट्रपती निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. या निवडणुकीची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली असून महाराष्ट्र शासनाच्या १५ जून २०२२ रोजीच्या राजपत्रात पुर्नप्रसिद्ध करण्यात आली आहे.

राष्ट्रपती निवडणूक-२०२२ च्या कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्रे सादर करण्याची बुधवार, दि. २९ जून २०२२ अंतिम तारीख असणार आहे. नामनिर्देशन पत्राची गुरुवार दि. ३० जून २०२२ रोजी छाननी करण्यात येणार आहे. उमेदवारी मागे घेण्याची अंतिम तारीख शनिवार दि. २ जुलै २०२२ राहणार आहे. तसेच आवश्यकता असल्यास सोमवार दि. १८ जुलै २०२२ रोजी निवडणूक होईल, असे महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे उपसचिव व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी ऋतुराज कुडतरकर यांनी कळविले आहे.

# बॅंकांकडून का येतोय ४५६ रुपये बॅलेन्स ठेवण्याचा मॅसेज

## बॅंका आणि पोस्ट ऑफिसकडून तुमच्या खात्यावर ४५६ रुपये बॅलेन्स ठेवा असे मॅसेज येत आहेत. खरं तर हा मॅसेज तुमच्या फायद्याचाच आहे. हा मॅसेज नक्की काय आहे?

क्राईम बॉर्डर न्यूज नेटवर्क

**मुंबई :** केंद्र सरकारने पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजना आणि पंतप्रधान विमा सुरक्षा योजनेचा वार्षिक हप्ता वाढवला आहे. या दोन्ही योजने थेट सर्वसामान्य जनतेशी संबधित आहेत. नुकतेच बॅंका आणि पोस्ट ऑफिसकडून आपल्या ग्राहकांना खात्यात ४५६ रुपये बॅलेन्स ठेवावेत असे मॅसेज येत आहेत.

PMJJBY चा प्रीमियममध्ये वाढ

पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजने (PMJJBY)अंतर्गत व्यक्तीचा कोणत्याही कारणामुळे मृत्यू झाल्यास नॉमिनीला २ लाख रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. यासाठी १८ ते ५० वर्ष वयाचे लोकं अर्ज करू शकता.आतापर्यंत या योजने साठी १२ रुपये प्रीमियम होता आता तो वाढून २० रुपये झाला आहे. PMSBY च्या प्रीमियममध्येही वाढ योजनेत सहभागी असलेल्या व्यक्ती अपंग झाल्यास १ लाख रुपये दिले जातात. ज्या व्यक्तींचे वय १८ ते ७० वर्षे आहे.ते या योजनांसाठी अर्ज करू शकता.या योजनेचा प्रिमीयम ३३० रुपये होता. तो आता ४३६ रुपये झाला आहे. दोन्ही योजनांचे ४५६ रुपये - केंद्र सरकारने दोन्ही योजनांच्या प्रीमियममध्ये वाढ केली आहे. दोन्ही कल्याणकारी योजनांचा प्रीमियम मिळून ४५६ रुपये होतो. या दोन्ही योजनांचा प्रीमियम जून महिन्यात कापला जातो. यासाठी सर्व बॅंका आणि पोस्ट ऑफिस आपल्या खातेधारकांना आपल्या खात्यात ४५६ रुपये बॅलेन्स असावा असे सांगत आहेत.★★★

# एटीएमची अदलाबदल करुन फसवणूक. आरोपी जेरबंद

क्राईम बॉर्डर न्यूज नेटवर्क

**ठाणे :** मीरा भाईंदर, वसई विरार परीसरात गेल्या काही महिन्यापासून एटीएम सेंटरमधून पैसे काढून देण्या साठी मदतीचा बहाणा करुन हात चलाखीने एटीएम कार्डाची अदला बदली करुन फसवणूक करणारी टोळी सक्रीय होती. सदर घटनांची वरीष्ठ पोलीस अधिकारी यांनी गांभीर्याने दखल घेवून आरोपींना शोधून पायबंद घालण्याबाबतच्या सूचना दिल्या होत्या.

त्यानूसार डिसीपी (गुन्हे), एसीपी (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष ३ विरारचे पोलीस पथक असे विविध गुन्ह्यांचा समातंर तपास करीत असतांना पो.हवा.सागर बारव कर यांना मिळालेल्या गुप्त माहिती वरुन १) दिपक उर्फ राधेश्याम शुक्ला वय २० वर्ष, २) शिखर कुमार विजय मिश्रा वय २१ वर्ष, रा. नाला सोपारा (प.) यांना धानीवबाग येथून ताब्यात घेतले. त्यांच्याकडे अधिक चौकशी केली असता विविध बॅंकाची ३४ एटीएम कार्ड मिळाले. यांच्यावर पेल्हार पोलीस ठाणे व कुळींज पोलीस ठाण्यात भा.द.वि. ४२० नूसार गुन्हे दाखल आहेत. यांनी उत्तर प्रदेशातील बस्ती सुलतान पूर, गौंडा या जिल्ह्यात अनेक गुन्हे केल्याची माहिती समोर आली आहे.अटक आरोपी दिपक हा सऱ्हाईत गुन्हेगार असून त्याच्यावर उत्तर प्रदेशातील विविध पोलीस ठाण्यात खूनाचा प्रयत्न गोळीबार करुन लूटमार,फसवणुक चोरीचे गंभीर गुन्हे दाखल आहेत.

# पारदर्शक प्रक्रियेद्वारे नोकरभरती - उद्योगमंत्री सुभाष देसाई

## एमआयडीसी सरळसेवा भरती प्रक्रियेतील ३४२ जणांना नियुक्तीपत्र प्रदान



**मुंबई :** महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या सरळसेवा भरती प्रक्रियेतील वर्ग 'क' आणि 'ड'मध्ये पात्र ठरलेल्या ३४२ जणांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. प्रातिनिधीक स्वरुपात पाच जणांना उद्योगमंत्री सुभाष देसाई यांच्या हस्ते मंत्रालयातील दालनात नियुक्तपत्रे प्रदान करण्यात आली. यावेळी उद्योग राज्यमंत्री कु.आदिती तटकरे, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. अन्बलगन, सह मुख्य कार्यकारी अधिकारी अजित पाटील आदी उपस्थित होते.

महामंडळातील सरळसेवेची वर्ग 'क' आणि 'ड'मधील १४ संवर्गातील ८६५ रिक्त पदे भरण्यासाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती.यातील ११ संवर्गातील ५०२ पदांकरिता ऑनलाइन परीक्षा घेण्यात आली.या परीक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांना नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली. त्यातील पाच जणांना प्रातिनिधीक स्वरुपात मंत्रालयात नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली.

दरम्यान, या परीक्षेत कुठलाही अनूचित प्रकार घडणार नाही, याची विशेष काळजी घेण्यात आली. भरती प्रक्रिया सुरळीत व यशस्वीरित्या पार पडण्यासाठी मुख्यालयीन स्तरावरून समन्वय साधण्या साठी नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला होता. सर्व प्रक्रिया कॅमेऱ्यामध्ये टिपण्यात आली. पात्र उमेदवारांच्या कागदपत्रांची छाननी झाल्यानंतर नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली.छाननी केल्यानंतर पात्र उमेदवारांना ऑनलाइन किंवा पोस्टाद्वारे नियुक्तीपत्रे पाठविण्यात आली आहेत. दरम्यान, शासनाद्वारे राबविलेली सर्वाधिक पारदर्शक नोकरभरती असल्याचे समाधान मंत्री श्री.देसाई यांनी व्यक्त केले. ★★★

## डोंबिवलीतील एमआयडीसीत सुरक्षा रक्षकाचा निर्घृन खून



क्राईम बॉर्डर न्यूज नेटवर्क

**डोंबिवली :** एमआयडीसीतील फेज १ मधील विजय पेपर मिल कंपनीच्या सुरक्षा रक्षकाची हत्या झाल्याची घटना बुधवारी सकाळी उघडकीस आली आहे. ग्यानबहादूर गुरुम (वय ६४) असे मृत सुरक्षा रक्षकाचे नाव आहे.

यासंदर्भात मानपाडा पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. डोंबिवली एमआयडीसी फेज १ मध्ये विजय पेपर मिल असून गेल्या काही वर्षापासून ही कंपनी बंद आहे. मात्र, या कंपनीत मोठ्या प्रमाणात भंगार पडून आहे. तर, या कंपनीत ग्यानबहादूर गुरुम हे गेल्या काही महिन्यांपासून सुरक्षारक्षक म्हणून काम पहात होते. सकाळी कंपनीत ग्यानबहादूर यांचा मृतदेह आढळून आला.

याबाबत मानपाडा पोलिसांना माहिती मिळाली असता पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी दाखल होऊन आणि पाहणी करून गुन्हा दाखल करत तपास चालू केला. मृतदेहाच्या डोक्यावर, चेहऱ्यावर लोखंडी हत्याराच्या सहाय्याने प्रहार केल्याच्या खूणा असल्याने ग्यानबहादूर यांचा खून झाला असावा असा पोलीसांचा कयास आहे. ★★★

## दीड वर्ष ७ जणांकडून लैंगिक अत्याचार तरुणीची इमारतीवरुन उडी घेत आत्महत्या



क्राईम बॉर्डर न्यूज नेटवर्क

**कल्याण :** एका १८ वर्षीय तरुणीने इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना दोन दिवसांपूर्वी कल्याण पूर्वेला घडली आहे. धक्कादायक बाब म्हणजे मृतक तरुणीचे लैंगिक अत्याचार करतानाचे अश्लील व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देत असल्याने तिने आत्महत्या केल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे. याप्रकरणात कोळसेवाडी पोलीस ठाण्यात सात महाविद्यालयीन तरूण, एक तरूणी, अशा आठ जणांविरोधात गुन्हा दाखल करत अटक करण्यात आली आहे.

पोलीस अधिकारी, नातेवाईक यांची प्रतिक्रिया दीड वर्षांपासून तरुणीला त्रास - मृतक तरुणी कल्याण पूर्वेतील काटेमानिवली भागातील एका इमारतीत कुटुंबासह राहात होती. ती कल्याण पूर्वेतील काटेमानिवली भागातील एका इमारतीत कुटुंबासह राहात होती. ती कल्याण पूर्वेतील एका महाविद्यालयात शिक्षण घेत होती. तिच्या सोबतच तिची मैत्रिणी आणि सात मित्र असा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा एक ग्रुप होता. दीड वर्षांपासून हे आरोपी सात तरूण, आणि एक तरुणी मिळून मृतक तरुणीला विविध कारणाने त्रास देत होते. शिवाय तिच्या साधेपणाचा गैरफायदा घेत आरोपी तरूणांनी तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. याच अत्याचार करतानाचे अश्लील व्हिडिओ आरोपी तरूणांनी तयार केले होते. गेल्या दीड वर्षापसून हेच व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी आठही आरोपी तिला वारंवार देत होते. यामुळे ही मृतक अस्वस्थ होती, असे कोळसेवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बशीर शेख यांनी सांगितले.म्हणून केली आत्महत्या - अश्लील व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. तर आपली, कुटुंबाची बदनामी होईल. घरात हा प्रकार समजला तर आपणास कुटुंबाच्या रोषाला सामोरे जावे लागेल, अशी भीती या तरुणीला होती. त्यामुळे नैराश्य आलेल्या तिने काटेमानिवली येथील राहत्या इमारतीच्या तिसऱ्या मजलावरून उडी मारून आत्महत्या केली. सोसायटीच्या आवारात मोठ्याने आवाज झाल्याने रहिवासी बाहेर आले. त्यावेळी त्यांना तरूणीने आत्महत्या केल्याचे समजले. या प्रकरणात कुटुंबीयांच्या माहितीवरून पोलिसांनी सात तरूण, एका तरूणीविरुध्द मानसिक त्रास देणे, आत्महत्येस प्रवृत्त करणे कायद्याखाली आरोपी विद्यार्थ्यांवर गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली आहे. आज दुपारच्या सुमारास आठही आरोपींना कल्याण जिल्हा सत्र न्यायालयात हजर करण्यात येणार असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक बशीर शेख यांनी दिली. ★★★

## मुंबईत १९ वर्षीय विवाहित महिलेवर सामूहिक बलात्कार, ४ आरोपींना अटक



क्राईम बॉर्डर न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबईतील कुर्ला परिसरात १९ वर्षीय विवाहित महिलेवर सामूहिक बलात्कार करण्यात आला. पीडितेच्या नातेवाईकांनी पैशासाठी तिच्यावर बलात्कार घडवून आणल्याची घटना तपासात समोर आली आहे. या प्रकरणात चार आरोपींना मंगळवारी रात्री नेहरू नगर पोलिसांनी अटक केली असून, त्यांना आज न्यायालयासमोर हजर करण्यात येणार आहे.

मुंबईत नोकरीच्या शोधात आलेल्या १९ वर्षीय विवाहितेवर मुंबईतील कुर्ला परिसरात सामूहिक बलात्कार करण्यात आला असून, नेहरूनगर पोलिसांनी सामूहिक बलात्काराचा गुन्हा दाखल करून ४ जणांना अटक केली आहे. या तिघांनीही बलात्कार करून कोणालाही सांगू नको असे पीडितेला सांगितले. मात्र, तीन महिन्यानंतर महिलेने याबाबत नेहरू नगर पोलिसात तक्रार केली. त्यानंतर पोलिसांनी सामूहिक बलात्काराचा गुन्हा दाखल केला आणि चौकशी सुरू केली आणि चार जणांना अटक केली.मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिला ही कोलकाता येथील मूळची रहिवासी आहे. ती दोन महिन्यांपूर्वीच मुंबईत आली होती. नोकरीच्या शोधात ही महिला मुंबईत आल्याची माहिती मिळते. तिचा मेहुणा तिला मुंबईत घेऊन आला होता. त्याने पीडितेला कुर्ला पूर्वेतील बर्मा सेल लाइन परिसरात झोपडीत राहणाऱ्या तिघांच्या हवाली केले होते. त्या बदल्यात त्याने पैसे घेतल्याची माहिती समोर येत आहे. या प्रकरणी पोलिसांनी मंगळवारी चार जणांना अटक केली आहे.

तीन महिन्यानंतर पीडितेने नेहरू नगर पोलीस ठाणे गाठून या घटनेची माहिती दिली. तिने पोलिसांत तक्रार दाखल केली. पीडितेच्या तक्रारीनुसार पोलिसांनी तात्काळ दखल घेत आरोपी मेहुणा, तसेच इतर तिघा आरोपींविरोधात सामूहिक बलात्काराचा गुन्हा दाखल केला. या प्रकरणी मंगळवारी पोलिसांनी चौघांनाही अटक केली. सर्व आरोपींना बुधवारी कोर्टात हजर करण्यात येणार आहे.★★★

## एमपीएससीच्या परीक्षांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्वाची अपडेट; कमाल संधींबाबत फेरबदल






क्राईम बॉर्डर न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (MPSC) पदभरती परीक्षांची तयारी करणाऱ्या उमेदवारांच्या कमाल संधींबाबत फेरबदल केला आहे.

उमेदवारांच्या कमाल संधींची मर्यादा रद्द करण्याचा निर्णय MPSCने घेतला असून, आता पूर्वीप्रमाणेच उमेदवारांना प्रवर्गासाठी निश्चित केलेल्या वयो मर्यादे नुसार परीक्षा देण्याची संधी मिळणार आहे. MPSCमार्फत विविध शासकीय पदांच्या भरती परीक्षा घेतल्या जातात. या प्रक्रियेत पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची नियुक्ती साठीची शिफारस एमपीएससी कडून शासनाला केली जाते. एमपीएससीने निश्चित केलेल्या वयोमर्यादेत उमेदवाराला कितीही वेळा परीक्षा देण्याची संधी उपलब्ध होती.

काय निर्णय होता ? मात्र निवड प्रक्रियेत सुधारणा करण्याच्या प्रक्रियेचा भाग म्हणून एमपीएससीने केंद्रीय लोक सेवा आयोगाच्या (UPSC) धर्तीवर खुल्या गटातील (दजह) उमेदवारांना कमाल सहा संधी, उर्वरित मागास प्रवर्गातील उमेदवारांना कमाल नऊ संधी २०२० मध्ये निश्चित केल्या, तर अनुसूचित जातीजमाती प्रवर्गातील उमेदवारांना कमाल संधीची मर्यादा लागू राहणार नसल्याचे एमपीएससीने स्पष्ट केले होते.

★★★

## गेल्या सहा महिन्यांत १९ अधिकारी आणि कर्मचारी एसीबीच्या सापळ्यात



क्राईम बॉर्डर न्यूज नेटवर्क

**ठाणे :** मागील वर्षी जानेवारी ते जून या कालावधीत ११ जणांना पोलिसांनी अटक केली होती.

ठाणे ते बदलापूर आणि भिवंडी क्षेत्रात गेल्या सहा महिन्यांमध्ये म्हणजेच, जानेवारी ते जून या कालावधीत ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रचलेल्या सापळ्यात १९ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना लाच घेताना ठाणे पोलिसांनी हातोहात पकडले आहे. मागील वर्षी जानेवारी ते जून या कालावधीत ११ जणांना पोलिसांनी अटक केली होती. यावर्षी सापळ्यांमध्ये वाढ झाली असून अटकेत असलेल्या आरोपींची संख्याही वाढल्याचे स्पष्ट झाले आहे. मागील वर्षांचे मुल्यांकन, दंड रद्द करण्यासाठी आणि वस्तू आणि सेवा कराचे नवे खाते काढून देण्यासाठी वस्तू आणि सेवा कर विभागाच्या साहाय्यक राज्यकर आयुक्त धनंजय शिरसाठ याला २० लाख रुपयांची लाच घेताना मंगळ वारी ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली. त्यामुळे सरकारी खात्यामध्ये लाचेची मागणी होत असल्याचा मुद्दा उपस्थित होत आहे. ठाणे जिल्ह्यातील ठाणे ते बदलापूर आणि भिवंडी शहरात ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने १ जानेवारी ते १४ जून या काला वधीत १३ सापळे रचण्यात आले. या १३ कारवाईमध्ये पोलिसांनी १९ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना अटक केली आहे. यामध्ये पोलीस, महापालिका, महावितरण, वन विभाग, महसूल विभाग, पाणी पुरवठा विभाग, वस्तू आणि सेवा कर विभाग यांसारख्या विभागांचा सामावेश आहे. सर्वसामान्य नागरिकांची अडलेली कामे पूर्ण करून देण्यासाठी लाचेची मागणी होत असल्याचे कारवाईत उघड झाले आहे. २०२१ मध्येही १ जानेवारी ते १४ जून या काला-वधीत ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने एकूण १० सापळे रचले होते. या कारवाईत पोलिसांनी ११ जणांना अटक केली होती. या कारवायांमुळे शासकीय विभागात भ्रष्टाचाराची कीड अद्याप कायम असल्याचे दिसून येत आहे.★★★

## अभिनेत्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल




क्राईम बॉर्डर न्यूज नेटवर्क

**मुंबई :** अभिनेता करणवीर बोहरा याच्यासह ६ जणांविरुद्ध मुंबईतील ओशिवरा पोलिसांत फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बोहरा याच्यावर अंधेरीच्या ओशिवरा भागात राहणाऱ्या ४० वर्षीय महिलेने १ कोटी ९९ लाख रुपये घेतल्याचा आरोप आहे. महिला कपड्यांचा व्यवसाय करते या महिलेकडून घेतलेले पैसे अभिनेत्याने परत केले नाही असा आरोप महिलेचा आहे.

आरोपी महिला मैत्रीण - २०१९ मध्ये अभिनेता बोहराचा 'हमे तुमसे प्यार कितना' हा चित्रपट आला. तेव्हा बोहराने एका महिलेशी मैत्री केली. हा चित्रपट प्रदर्शित करण्यासाठी या महिलेकडून 3५ लाख रुपये घेतले. त्यानंतर आरटीजीएसद्वारे १ कोटी ६४ लाख रुपयेही घेतले, असा दावा महिला तक्रारदाराने केला आहे. पैसे घेताना बोहराने अडीच टक्के व्याजाने पैसे परत करण्याची हमी दिली. त्यामुळे महिलेने आरोपीच्या बोलण्यावर विश्वास ठेवला आणि त्यासाठी आरोपीने आपल्या फ्लॅटचे कागदपत्राची एक झेरॉक्स प्रत महिलेला दिली.एक कोटी केले परत - बोहरा यांनी एक कोटीहून अधिक रक्कम परत केली आहे. मात्र, उर्वरित रक्कम देत नसल्याचे महिलेने पोलिसांना सांगितले. आम्ही बोहरा यांच्याशी बोललो असता त्यानी योग्य प्रतिसाद दिला नाही आणि शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. ओशिवरा पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला असून, पोलीस लवकरच त्यांना पोलीस ठाण्यात बोलावून त्यांचे जबाब नोंदवतील. ★★★

Printed , Published, Owned & Editor - Rajendra Shrawan Vakhare, Printed at SIDDHAKALA PRINT MEDIA & PUBLICATIONS PVT. LTD., PLOT. No. W-230, TTC Industrial Area, Khairne MIDC, Navi Mumbai- Dist. Thane.MAHARAHTRA - 400710 Published From - Flat no 219, First Floor, L.I.G. Blg No 16, Opp- Birla College Chikanghar, Kokan Vasahat, Kalyan (w), Taluka - Kalyan, Dist- Thane. Pin Code- 421301- (Maharashtra) Mob. 09987496136,09619630035,08655004586 ( REGD.No.MAHBIL/2010/41122 Email - crimeborder@gmail.com Mob.9619630035

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री.राजेंद्र श्रावण वखरे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया,ॲण्ड पब्लिकेशन प्रा.लि.डब्ल्यू ,२३०, टीसीसी इंडस्ट्रियल एरिया खैरणे,एम आय डी सी , ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई ,जि. ठाणे -४००७१०, येथे छापून फ्लॅट नं. २१९, पहिला मजला, एल.आय.जी. बिल्डींग नं. १६, बिर्ला कॉलेज समोर, चिकणघर, कोकण वसाहत, कल्याण (प.), ता. कल्याण, जि. ठाणे - ४२१३०१येथून प्रकाशित केले.(रजि.नं. एमएएचबीआयएल २०१०/४११२२) Email.crimeborder@gmail.com